**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी आणखी तेराशे कोटींच्या मदतीचा शासन निर्णय जारी

- नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत लोकार्पण

- गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार, २१ मंत्र्यांनी घेतली शपथ

**आणि**

- छत्तीसगडमध्ये २०८ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

गेल्या महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी एक हजार ३५६ कोटी रुपयांची मदत मंजूर झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे. सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या जिल्हांमधल्या २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१ हेक्टरहून अधिक बाधित पिकांसाठी ही मदत मिळेल. यासाठीचा शासन निर्णय झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

या आपत्तीत मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना, ज्यांच्या पशुधनाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना जिल्हास्तरावरुन मदत दिली जाणार आहे. यामुळे त्या प्रकारातल्या मदतीचं वितरण ताबडतोब होईल, असंही मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

अतिवृष्टीची झळ बसलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं केलेली मदत तुटपुंजी असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळं

हवालदिल झालेल्या शेतकरी वर्गाबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पक्षानं आज दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी बारामती इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

राज्यसरकार हेक्टरी फक्त १० हजार रुपयांची मदत देत आहे, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात उड्डाण केलं. ओझरमधल्या हिंदुस्थान एरोनॉटिक्सच्या कारखान्यात हा कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी तेजस एमके वन ए या लढाऊ विमानाच्या उत्पादन साखळीचंही लोकार्पण केलं. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**होल्ड - राजनाथ सिंग बाइट**

नाशिकमध्ये तयार झालेल्या सुखोई-३०, एलसीए आणि एचटीटी-४० विमानांच्या उड्डाणांचं राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं. हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं उड्डाण असल्याचं ते यावेळी म्हणाले. सध्या भारतानं संरक्षण उत्पादनांमधे ६५ टक्के स्वयंपूर्णता गाठली असून याबाबतीत देशाला शंभर टक्के आत्मनिर्भर बनवण्याचं ध्येय असल्याचं राजनाथसिंह यांनी सांगितलं.

राजनाथ सिंग यांनी यावेळी 'LCA MK-1A' च्या तिसऱ्या तसंच 'HTT 40 एअरक्राफ्ट' च्या दुसऱ्या उत्पादन साखळीचं लोकार्पण केलं.

**<><><><><>**

भारतीय लष्कराने एकशे तेरा इलेक्ट्रिक बसेस आपल्या ताफ्यात समाविष्ट केल्या आहेत. यामुुळे तीनही सेवांमध्ये तंत्रज्ञानाचं नवं युग सुरु होईल असं लष्कराच्या निवेदनात म्हटलं आहे. पीएम ई ड्राईव उपक्रमातून स्वच्छ आणि हरीत

पर्यावरणाच्या दिशेने उचललेलं हे पाऊल आहे असंही यात म्हटलं आहे. लष्कराने या बसेससाठी ४३ वेगवान चार्जर्सही घेतले आहेत तसंच १३० कोटीं रुपयांचा करार केला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात यंदाच्या हंगामात रब्बी पीकांचं क्षेत्र ५७ वरुन ६५ लाख हेक्टरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळं रब्बी हंगामाचं नियोजन अधिक सक्षम आणि समन्वित पद्धतीनं करण्याच्या सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या आहेत. पुण्यात आज झालेल्या रबी हंगामाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. धरणं, विहिरी तुडुंब भरल्याने शेतकऱ्यांना या वर्षी पाण्याची फारशी टंचाई भासणार नसल्यानं रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात पेरण्या होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

हवाई दलातल्या सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दर्जा, व्यावसायिकता, सुरक्षा आणि कार्यक्षमता यासाठी कायम वचनबद्ध रहावं. त्यातूनच देशाच्या हवाई रक्षणासाठी भारतीय हवाई दल प्रभावीरित्या कार्यरत राहू शकेल, असं हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी आज सांगितलं. नागपुरात हवाई दलाच्या देखरेख विभागात आयोजित कमांडरांच्या परिषदेत ते बोलत होते. तांत्रिक क्षमतांचा देशांतर्गत विकास करणं या विषयावर ही दोन दिवसीय परिषद होती.

**<><><><><>**

गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. त्यात २१ मंत्र्यांनी शपथ घेतली. माजी गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गांधीनगरमध्ये आयोजित कार्यक्रमात नवीन मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

आधीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री असलेले प्रफुल्ल पानसेरिया यांना कॅबिनेट मंत्री पदी बढती मिळाली. क्रिकेटपटू रविंद्र जडेजा याची पत्नी रिवा बा यांनीही राज्यमंत्री पदाची शपथ घेतली. एकूण ५ कॅबिनेट मंत्री, ३ स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री आणि १२ राज्यमंत्र्यांचा आज शपथविधी झाला. यावेळी मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यामुळं जवळपास संपूर्ण अबूजमाड आता नक्षलवाद्यांच्या प्रभावातून मुक्त झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये ११० महिला आणि ९८ पुरुष आहेत. त्यांनी १९ एके-४७ रायफली आणि १७ SLR रायफलींसह एकंदर १५३ शस्त्र पोलिसांकडे जमा केली.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या प्रधानमंत्री डॉक्टर हरिणी अमरसूर्या यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीमुळे भारत श्रीलंकेदरम्यानच्या संबंधांना नवी गती मिळेल, अशी आशा या भेटीवेळी प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केली. शिक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष विकास सहकार्य आणि मच्छिमारांच्या विकासासह अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत करण्याच्या दृष्टीने दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. दोन्ही देशांच्या सामायिक विकासाच्या प्रवासात एकत्र काम करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी केला.

**<><><><><>**

इजिप्तचे प्रधानमंत्री डॉक्टर बद्र अब्देलट्टी यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. गाझा पट्ट्यातल्या शांततेसाठी इजिप्तचे राष्ट्रपती अब्देल फत्तेह अल सिसी यांच्या प्रयत्नांबदल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं

आणि या भागात शांतता कायम राहावी, यासाठी कामना केली. अब्देलट्टी यांनी भारत-इजिप्त धोरणात्मक संवादाविषयी प्रधानमंत्री मोदी यांना माहिती दिली.

**<><><><><>**

देशातल्या प्रत्येक आदिवासी गावाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने आदिकर्मयोगी अभियान सुरू करण्यात आल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. नवी दिल्ली इथे आदि कर्मयोगी अभियानावरच्या राष्ट्रीय परिषदेला त्या आज संबोधित करत होत्या. या अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समुदाय राष्ट्रीय विकासाच्या प्रवासात सहभागी होतील आणि विकासाचा लाभ आदिवासी भागांपर्यंत पोहोचेल याची खात्री करणं आवश्यक आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. आज नितीश कुमार यांच्या मंत्रीमंडळातल्या चार मंत्र्यांसह प्रमुख उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. अर्जांची छाननी उद्या होणार आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत येत्या सोमवारपर्यंत आहे. या टप्प्यात १२१ मतदारसंघांमधे येत्या ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

दरम्यान, बिहारमधे निवडणुक प्रचाराला वेग आला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज सरन जिल्ह्यात तरैया इथं प्रचार सभा घेतली. त्यानंतर पटणा इथं भाजपानं आयोजित केलेल्या विचारवंताच्या परिषदेला त्यांनी संबोधित केलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी बिहारला औद्योगिक केंद्र बनवेल, असं आश्वासन शहा यांनी दिलं.

**<><><><><>**

गुवाहाटी इथं सुरु असलेल्या जागतिक कनिष्ठ गट बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तन्वी शर्मानं महिला एकेरीची उपांत्यफेरी गाठली आहे. उप-उपांत्य

फेरीत जपानच्या साकी मात्सुमोटोवर १३-१५, १५-९, १५-१० अशी मात करत तन्वीनं उपान्त्य फेरीत धडक मारली आहे.

मात्र उन्नती हुडा ही भारतीय बॅडमिंटनपटू पराभूत झाली आहे. थायलंडच्या अन्यापत फीचीटफॉन कडून ९-१५, ७-१५ असा पराभव पत्करावा लागल्यानं तिची आगेकूच थांबली आहे.

भारताच्या भव्या छाबरा आणि विशाखा टोप्पो या मिश्र दुहेरीतल्या जोडगोळीचं आव्हानही आज संपुष्टात आलं. चीनच्या हंग बिंग फू आणि चौ युन यान या जोडीनं त्यांच्यावर ९-१५ आणि ७-१५ अशी मात केली.

//<><><><><>//